श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी
महिला विद्यापीठ, मुंबई



## "उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय@ मुंबई "

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत **"उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय@ मुंबई "** हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राचे मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. उदय सामंत, उच्च व तंत्र शिक्षण विभागातील मंत्रालय व संचालक अधिका-यां समवेत नेहरु सेंटर सभागृह, वरळी, मुंबई येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठातील विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठ कर्मचारी, शैक्षणिक संस्थास आदी विविध घटकांच्या अडीअडचणी ऐकूण घेऊन त्या सोडविणार आहे.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने सर्व संबंधित घटकांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या www.sndt.ac.in या वेबसाईटच्या मुख्यपृष्ठावर उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय@ मुंबई ही विशेष लिंक निर्माण केली आहे. येथे नागरिकांनी इंग्रजी अथवा मराठीतून आपले प्रश्न मांडता येणार आहेत. निवेदनाची सॉफ्ट कॉपी सोडण्याची व्यवस्थाही येथे आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांनी आपली निवेदने ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ज्यांना ऑनलाईन निवेदन शक्य होणार नाही, त्यांनीही प्रत्यक्ष उपस्थित राहून मा. मंत्री महोदयांना आपले निवेदन सादर करता येईल.

उपक्रमाचा दिनांक : **सोमवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२१**
वेळ : **सकाळी ११.०० वाजता**
स्थळ : **नेहरु सेंटर सभागृह, वरळी, मुंबई.**

**(डॉ. मीना कुटे)**
**कुलसचिव (प्रभारी)**